# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 September 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ सप्टेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- स्वहिताआधी देशहिताचा विचार करावा–उपराष्ट्रपतींचं आवाहन;राज्यभरातल्या संविधान मंदिरांचं लोकार्पण
- देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा काल पंतप्रधानांच्या हस्ते शुभारंभ
- धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेशासाठी राज्यसरकार सकारात्मक–मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- केंद्र तसंच राज्यातलं सरकार शेतकरी विरोधी असल्याची शरद पवार यांची टीका

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा मुक्तिसंग्रामातल्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनाचं उद्घाटन

****

स्वहिताच्या आधी देशहिताचा विचार करण्याचं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उभारलेल्या संविधान मंदिराचं काल मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून दूरदृश्य पद्धतीनं लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असलेली भारतीय राज्यघटना ही फक्त मिरवण्यासाठी नसून, तिचा गाभा समजून घेण्याची गरज धनखड यांनी व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनी संविधान मंदिरांचं लोकार्पण करण्याचा हा क्षण अविस्मरणीय आहे, या मंदिरांमुळे राज्यघटनेबद्दल जागृती वाढेल, असा विश्वास धनखड यांनी व्यक्त केला. राज्यघटनेनं दिलेल्या आरक्षणाला

काही लोक विरोध करत आहेत, मात्र आरक्षण हा भारताचा, राज्यघटनेचा आत्मा आहे. युवा पीढीनं सर्वत्र राष्ट्राचा गौरव वाढवावा असं आवाहन त्यांनी केलं.
उपराष्ट्रपती धनखड यांनी काल नागपूरमध्ये रामदेवबाबा अभिमत विद्यापीठात डिजिटल टॉवरचं उद्घाटन केलं. या १२ मजली डिजिटल टॉवरमध्ये संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या डिजिटल वर्गांचा समावेश आहे. यावेळी उपराष्ट्रपतींनी त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सुदेश धनखड यांच्यासमवेत विद्यापीठ परिसरात `एक पेड मां के नाम` अभियानांतर्गत वृक्षारोपण केलं.

****

केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांअंतर्गत बांधण्यात आलेल्या देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा शुभारंभ आणि ४६ हजार लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश सोहळा काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झारखंडमध्ये रांची इथं पार पडला. या योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात एकूण ३२ हजार कोटी रुपयांचा थेट मदतीचा पहिला हप्ता जमा करण्यात आला. प्रधान मंत्री आवास योजना–ग्रामीणच्या २० हजार लाभार्थ्यांना पंतप्रधानांच्या हस्ते आवास मंजुरी पत्रांचं वाटपही काल करण्यात आलं. सहा वंदे भारत रेल्वे गाड्यांना पंतप्रधानांनी यावेळी हिरवा झेंडा दाखवला.

****

धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील. हा समावेश कायद्याच्या चौकटीत टिकणारा असेल, आणि अन्य कुठल्याही समाजावर अन्याय करणारा नसेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. धनगर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल धनगर जमात समन्वय समितीच्या शिष्टमंडळासोबत काल मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्या आंदोलकांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधून, या निर्णयाबाबत आश्वस्त केलं.

****

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा केली आहे. येत्या दोन दिवसांत आम आदमी पार्टीच्या सर्व आमदारांची बैठक घेऊन त्यात नव्या मुख्यमंत्र्याचं नाव निश्चित केलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

****

केंद्रातलं तसंच राज्यातलं महायुतीचं सरकार हे शेतकरी विरोधी असल्याची टीका, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केली आहे. धुळे जिल्ह्याल्यात शिंदखेडा इथं काल शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था नाही त्याचप्रमाणे राज्यात महिला सुरक्षित नसल्याची टीका पवार यांनी केली.

****

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करणार, असं आश्वासन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. अहमदनगर जिल्ह्यात शिर्डी इथं, जुनी पेन्शन योजनेच्या राज्य अधिवेशनात ते काल बोलत होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं देखील काल उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसंवाद मेळावा पार पडला. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पैठण इथल्या संत एकनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष सचिन घायाळ यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटात प्रवेश केला.

****

अभियंता दिन काल साजरा झाला. नागपूर इथं सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते राज्यस्तरीय उत्कृष्ट अभियंता पुरस्कार काल प्रदान करण्यात आले. अतांत्रिक संवर्गातील कर्मचारी यांचा सत्कार तसंच उत्कृष्ट प्रकल्प पुरस्कार देखील यावेळी वितरीत करण्यात आले.

****

दहा दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची उद्या सांगता होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्वत्र गणेश विसर्जनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी शहरातील विविध विसर्जन विहिरी आणि कृत्रिम तलावांची पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. तसंच आवश्यक सूचना केल्या.

लातूर इथं गणपती विसर्जनाच्या अनुषंगानं, जनतेच्या सोयीसाठी आणि सुरक्षीततेच्या दृष्टीनं शहरातल्या विसर्जन मार्गावर वाहतूक बंद करुन पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्यात येणार आहे. उद्या सकाळी दहा ते रात्री अकरा वाजून पन्नास मिनिटांपर्यंत ही पर्यायी मार्गाची व्यवस्था असेल, असं प्रशासनानं कळवलं आहे.

****

परदेशात गणेशोत्सव कसा साजरा होतो, याबाबत आपण दररोज माहिती घेत आहोत. मस्कतमध्ये साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाबाबत गणेश घुगे यांनी माहिती दिली..

***''दरवर्षी आम्ही गणपतीचा उत्सव साजरा करतो. गणपतीसाठी आम्हाला एक ठिकाण आहे रूई म्हणून. तिथे आम्हाला भारतातून गणेशमूर्ती इम्पोर्ट करतात. आणि ते आणून आम्ही इथे सण साजरा करतो. ढोलताशाचा गजर वगैरे इथं काही प्रकार नाही. आणि प्रसाद दोन वेळेला असतो. सकाळ संध्याकाळ प्रसाद करतो. गणपतीची आरती करतो. भजन करतो. आणि आनंदाने हा सण आम्ही इथे साजरा करतो.''***

****

प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिन ईद – मिलाद– उन – नबी आज साजरी होत आहे. यानिमित्त आज सर्वत्र मिलाद महफिल आणि सीरत संमेलनांचं आयोजन करण्यात आलं आहे. ईद निमित्त ठिकठिकाणी मिलाद जुलूस देखील काढले जातात. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

ईद–ए–मिलाद निमित्त छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि परभणी जिल्ह्यासाठी आज सार्वजनिक सुटी कायम ठेवण्यात आली आहे. तर बीड जिल्ह्यात येत्या बुधवारी १८ तारखेला ईद–ए–मिलादची सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. यासंदर्भातली परिपत्रकं संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी काल जारी केली.

****

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा संघर्ष, त्याग आणि बलिदानाचा जाज्वल्य इतिहास पुढच्या पिढीपर्यंत वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे पोहोचवावा, असं आवाहन राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं सिद्धार्थ उद्यानात भरवण्यात आलेल्या, दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनाचं उद्घाटन काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. खासदार भागवत कराड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा केंद्रीय संचार ब्यूरो आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रदर्शन भरवण्यात आलं आहे.

उद्या १७ तारखेपर्यंत हे प्रदर्शन सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सर्वांसाठी खुलं आहे.

****

दरम्यान, उद्या साजरा होणाऱ्या मराठवाडा मुक्तिसंग्रामाचं मुख्य शासकीय ध्वजारोहण छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान, 'मुक्तीसंग्राम- कथा मराठवाड्याच्या संघर्षाची' हा ७५ मिनिटांचा माहितीपट आज सह्याद्री वाहिनीवर दुपारी २ वाजता प्रसारित होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी माहितीपट पाहावा असं आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलं आहे.

****

शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीसाठी शेतीबरोबरच पशुपालन या जोडधंद्याकडेही वळावं, असं आवाहन कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. बीड जिल्ह्यात परळी तालुक्यातल्या मोहा आणि सिरसाळा इथल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचं लोकार्पण केल्यानंतर ते काल बोलत होते.

दरम्यान, अंबाजोगाई इथले ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांच्या तीन पुस्तकांचं प्रकाशन काल धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत झालं. ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर वृषाली किन्हाळकर, आमदार नमिता मुंदडा यावेळी उपस्थित होत्या.

****

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर इथं उपोषण करत असलेल्या राजश्री उंबरे यांनी उपोषण स्थगित केलं आहे. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर काल त्यांनी उपोषण स्थगित करत असल्याचं घोषित केलं. उंबरे यांचं गेल्या १४ दिवसांपासून क्रांती चौकात उपोषण सुरु होतं.

****

परभणी इथं काल धनगर समाजाच्या वतीनं मेघालयचे राज्यपाल सी.एच.विजयशंकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे, आमदार मेघना बोर्डीकर, कुलगुरू डॉ.इंद्र मणि उपस्थित होते. आर्थिक प्रगतीसाठी शिक्षणावर भर देण्याची गरज विजयशंकर यांनी यावेळी व्यक्त केली.

****

केंद्र सरकारने सोयाबीन तेलावरील आयात शुल्क वाढवण्याचा घेतलेला निर्णय आणि कांदा निर्यातीला दिलेलं प्रोत्साहनाचं, आमदार राणा जगजीत सिंह पाटील यांनी स्वागत केलं आहे. ते काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन खरेदी आधारभूत केंद्र पुढच्या काही दिवसात सुरू होतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यात गणेशपूर – पाटणा रस्त्यावर बिबट्याच्या हल्ल्यात एका १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. रितेश मोरे असा या मुलाचा नाव असून तो गणेशपूर पिंप्री इथलं रहिवासी होता.

****